

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)
(UGC Approved
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 4 NO. 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT CHALLENGES AND SOLUTIONS

27th January, 2018

(Book IV)



*Editor*
**Mr. Eshwar L. Rathod**

*Principal*
**Dr. A. D. Mohekar**

ORGANIZED BY

DEPARTMENT OF SOCIOLOGY
DNYAN PRASARAK MANDAL'S
SHIKSHAN MAHARSHI DNYANDEO MOHEKAR MAHAVIDYALAYA,
KALAMB. DIST. OSMANABAD

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 85. कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. पवार विद्युलता शाहुराव | 209 |
| 86. लिंगभाव आणि विकास | मोकासरे जी. टी. | 211 |
| 87. हुंडा-प्रथा, समाज आणि स्त्रिया | प्रा.सुजाता आर नाईक (गवई) | 213 |
| 88. कौटूंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | श्री लंजिले प्रदिप मारोती | 216 |
| 89. स्त्रीवादी अभ्यास - विकास व स्त्रीया | राजश्री विष्णु पांचाळ | 218 |
| 90. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांचे स्थान एक समाजशास्त्रीय आभ्यास | कु.महाजन सविता प्रकाशराव | 220 |
| 91. विज्ञान क्षेत्रातील महिलांचे योगदान एक समाजशास्त्रीय आभ्यास | घुगे जयश्री बापुराव | 222 |
| 92. लिंगभाव विषमता आणि स्त्रियां | कु. प्रगती भाऊराव हरले | 223 |
| 93. महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ.बालाजी किशनराव पाटील | 224 |
| 94. The 'E' dimensions of Women Empowerment | Mrs.Pratima Chavan | 226 |



Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

86.

# लिंगभाव आणि विकास

**मोकासरे जी. टी.,**
सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

**उद्येशः-** लिंगभाव व विकास यांचा परस्पर संबध जाणून घेणे. भारतातील महिलांची विकासातील भूमिका जाणून घेणे. हे उद्येश समोर ठेवून सदरील पेपरची मांडणी केलेली आहे.

**तथ्य संकलनः-** सदरील पेपर तयार करतांना तथ्य संकलनाच्या व्दितीय पध्दतीचा वापर करण्यात आला असून, संदर्भ ग्रंथ, मासिके, विविध अहवाल व इंटरनेट या स्त्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे.

**प्रस्तावनाः-**

लिंगभाव हि एक सामाजिक संकल्पना असून, तिच्यामध्ये समाजात होणाऱ्या स्त्री पुरषातील भेदभावाचा निर्देश होतो. भारतामध्ये पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्री पुरूष भेदभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीने विचार केला असता असे दिसुन येते की, समाजातील जवळपास पन्नास टक्के संख्या स्त्रीयांची असते. परंतु भारतासारख्या पुरूषप्रधान देशामध्ये स्त्रीयांना आर्थिक क्रियांचे स्वातंत्र्य खुप कमी असते. त्यामुळे विकासाला खिळ बसते. १९ व्या शतकाच्या पुर्वाधापर्यंत विकासाची व्याख्या केवळ आर्थिक दृष्टीकोनातून केली जात असे. प्रसिध्द अर्थतज्ञ एडम स्मिथ, कार्ल मार्क्स व डेविड रिकार्डो यांनी सुध्दा विकासाची व्याख्या भांडवल, उद्योजकता, दरडोई उत्पन्न, एकूण राष्ट्रीय उत्पन्न या आर्थिक घटकांनाच अनुसरून केलेली आहे. परंतु १९९० नंतर विकासाच्या संकल्पनेत खुप बदल झाला. मानव विकास निर्देशांक, चिरंतन विकास, सामाजिक विकास, लिंगभाव आणि विकास यादृष्टीकोनातून आता विकासाची व्याख्या केली जाते. यासर्व दृष्टीकोनांमध्ये महिलांचे सामाजिक स्थान कसे आहे, महिला साक्षरता दर कसा आहे, मातामृत्यु दर किती आहे, राजकीय व आर्थिक क्रियांचे स्वातंत्र्य महिलांना आहे का ? या निकषांवरून विकासाचे मोजमाप केले जाते.

विकासाच्या समाजशास्त्रामध्ये व विकासाच्या अर्थशास्त्रामध्ये महिलांचे स्थान केंद्रस्थानी आहे. महिलांच्या आर्थिक क्रिया, उद्योजकता व सामाजिक स्थान याचा अर्थव्यवस्थेवर कसा प्रभाव पडतो याचा येथे अभ्यास केला जातो.
भारतासारख्या विकसनशील देशात आजही बहुतांश महिलांचे श्रम हे गैरमौद्रिक आहे. त्याच्या श्रमाचा मोबदला पैशाच्या स्वरुपात मिळत नाही. उदा. मुलांचे संगोपन, स्वयंपाक घरातीत काम इ. अनेक महिलांच्या श्रमाचे मुल्य केले जात नाही तसेच बहुतांश महिलांचे श्रम बाजारापर्यंत पोहचतच नाही. त्यामुळे त्यांना त्याचे मुल्य मिळत नाही. मुल्य न मिळाल्याने त्यांचे वैयक्तिक उत्पन्न निर्माण होत नाही. परीणामी त्याचा कौटुंबिक व एकूण राष्ट्रीय उत्पन्नावर परीणाम होउन देशाच्या अर्थव्यवस्थेचे नुकसान होते. १९९५ च्या संयुक्त राष्ट्राच्या मानव विकास अहवालानुसार, गैरमौद्रिक श्रमामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला १६ अरब डॉलरचे नुकसान झाले होते. यामध्ये ११ अरब डॉलर नुकसान केवळ महिलांच्या गैरमौद्रिक श्रमामुळे झाले होते. याउलट अनुभव असा आहे की, महिला हया पुरुषांपेक्षा जास्त व अधिक वेळ काम करतात. नुकतेच जागतिक बँकेने प्रसिध्द केलेल्या अहवालात असे स्पष्ट केले आहे की, भारतातील महिलांचे श्रमाचे प्रमाण विकसित व विकसनशील देशांपेक्षाही कमी आहे.श्रमाच्या बाबतीत जागतिक बँकेच्या १८५ देशाच्या यादीत भारताचा क्रमांक १७२ वा आहे. यां अहवालानुसार भारतात महिला कर्मच्याऱ्यांची संख्या केवळ २४ टक्के आहे.

भारतातील महिलांकडे आजही एक गृहणी म्हणूनच बघीतले जाते. त्यामुळे तिचे जग चुल व मुल यापर्यंतच मर्यादित असते. प्राचीन भारतात सुध्दा जात ही व्यवसाय निवडीचे प्रमुख माध्यम होते आणि जातीच्या माध्यमातूनच व्यक्तीचा सामाजिक दर्जा निर्धारीत होत होता. जातीच्या दृष्टीकोनातून महिलांचे तीन प्रकार पडत होते. पहिला प्रकार श्रीमंत महिलांचा होता. याप्रकारातील महिला केवळ घरघुती काम करायच्या, घराची चौकट ओलांडने हे त्याच्या अप्रतिष्टेचे लक्षण होते. दुसरा प्रकार मध्यम जातीच्या महिलांचा होता तर तीसरा प्रकार हा कनिष्ट महिलांचा होता. या दोन्ही प्रकारातील महिला या कौटुबिक कामे करुण, घराबाहेरील शेतीविषयक कामे करायच्या त्यामुळे त्याच्या श्रमाचे योगदान हे ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका निभावत असे. मात्र उच्च जातीच्या महिलांचे श्रम हे गैरमौद्रिक होते.

भारतातील महिलांच्या संदर्भात आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे उत्पादनाच्या साधनांवर किंवा संपत्तीवर त्यांची मालकी नसते. मुलगी ही परक्याची धन मानली जाते. त्यामुळे तीच्या नावावर जमीनीची, घराची किंवा उद्योगाची मालकी केली जात नाही. म्हणून ती नेहमी आर्थिक दृष्टीने असुरक्षीत असते. ही स्थिती भारतातच नव्हे तर विकसित देशात सुध्दा आहे.मानव विकास



Scanned with CamScanner

अहवाल( २०१६ ) नुसार विकसित देशातही फक्त १० ते २० टक्केच महिलांच्या नावे जमीनीची मालकी आहे. याशिवाय भारतीय महिला जात, धर्म व पुरुषप्रधान संस्कृतीच्या वर्चस्वामुळे त्यांच्यामध्ये उद्योजकता गुण विकसित झाला नाही. त्यामुळे भारतात फारश्या महिला उद्योजक निर्माण झाल्या नाहीत. 'नॅशनल सॅम्पल सर्व्हेच्या' 6th इकॉनोमीक जनगणनेनुसार भारतात केवळ १४टक्के उद्योग महिला चालवतात. भारतात एकूण ५८.५दशलक्ष उद्योग असून, त्यापैकी ८.०५ दशलक्ष उद्योग महिलांकडून चालवले जातात. 'Global Women Enterpreneurs Leader Report' -२०१५ नुसार महिला उद्योजकतेच्या संदर्भात ३१ देशांच्या यादित भारताचा २९ वा नंबर आहे. यामध्ये नायजेरीया, उगांडा, घाना हे देशही भारताच्या पुढे आहेत.

२०१६ च्या युनायटेड नेशनच्या हयुमन डेव्हेलपमेंट रिपोर्ट नुसार भारताचा मानव विकास निर्देशांकाच्या १८८ देशाच्या यादित १३१ वा क्रमांक आहे. या अहवालानुसार भारतातील महिलाचे दरडोइ वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्न (Gross National Income Per Capita ) केवळ २१८४ आहे तर पुरुषांचे ८८९७ एवढे आहे. तर हेच प्रमाण नार्वे या देशाचे जो HDI मध्ये प्रथम क्रमांकाचा आहे तेथे महिलाचे ५०८०० तर पुरुषांचे ७५३१४ एवढे आहे. भारतात आजही महिलांचे राजकीय पक्रीयेतील सहभाग नगन्य आहे. भारतीय संसदेत महिलांचे प्रमाण आजही ( २०१५ ) महिलांचे प्रमाण केवळ १२ टक्के आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे, परंतु तेथेही महिलांचा कारभार पुरुषच बघतांना दिसून येते. आजही भारतात ३५ टक्के महिला निरीक्षर आहे हेच प्रमाण ग्रामीण भागात व आदिवासी भागात जास्त आहे. यासर्व कारणांमुळे भारतीय महिला आर्थिक, राजकीय क्रियांमधून बाहेर फेकल्या गेल्या व त्याचा अर्थव्यवस्थेवर परीणाम होउन, देशाचा सर्वांगिण विकास होउ शकला नाही.

**सारांशः-**

१९९० नंतर विकासाच्या दृष्टीकोनामध्ये जागतिक स्तरावर मोठ्या प्रमणात बदल घडून आलेत. केवळ आर्थिक विकास म्हणजे विकास नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण इ. विवध पैलुच्या दृष्टीकोनातून विकासाकडे पाहिले जात आहे. विकासाच्या मानव विकास दृष्टीकोन, लिंगभाव व विकास या दृष्टीकोनानुसार तर विकासाचे मोजमाप करतांन महिलांन केंद्रस्थानी ठेवून विकासाची व्याख्या केली जाते. भारताचा पुर्ण विकास न होण्याचे कारण देखील महिलांचे मागसलेपणच आहे. येथील पुरुषप्रधान संस्कृतीने तीला घराच्या बाहेर पडून काम करुच दिले नाही. त्यामुळे येथील महिला उद्योजक बनल्या नाहीत. त्या जे काम करतात ते गैरमौद्रिक आहे, त्याचे मुल्य त्यांना मिळत नाही. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के भाग हा उत्पादन प्रक्रियेत सहभागच घेत नाही. ३५टक्के भारतीय महिला आजही निरक्षर आहे. याबाबींचा प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थवर पडतो व विकासात आपण पाठीमागे राहतो. जोपर्यंत आपण नार्वे, जपान, अमेरिका, चीन इ. देशांप्रमाणे स्त्रीयांना आर्थिक, सामाजिक, राजकीय क्रियांमध्ये सामावून घेवू शकत नाही , तोपर्यंत आपले महासत्ता बनण्याचे स्वप्न हे स्वप्नच राहणार आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. विकास का समाजशास्त्र, शिवबहाल सिंह,रावत पब्लीकेशन, जयपूर, २०१०.
२. सामाजिक अनुसंधान, दोषी व जैन,रावत पब्लीकेशन, जयपूर, २०१०.
३. Human Development Report -2016 published by UNDP
४. विकास का समाजशास्त्र, वाणी प्रकाशन, दिल्ली, १९६६.
५. www. National Sample Survey Report
६. Globle Women Enterpreneure Leder Report, 2015.

❑❑❑



Scanned with CamScanner

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | जागतीकीकरण , ग्रामीण विकास व ग्रामसभा | प्रा उन्मेश अजाबराव घुगे | 61 |
| 17 | आदिवासी समुदाय आणि जागतिकीकरणाची प्रक्रिया | सहा.प्रा.रविंद्र एस.मडावी | 65 |
| 18 | जागतिकीकरण आणि नागरी कुटूंब | प्रा. उध्दव शिवाजी जमधाडे | 68 |
| 19 | जागतिकीकरण : समाज आणि स्त्रीजीवन | प्रा.श्रीमती. इंदू चंद्रकांत साळुंके | 71 |
| 20 | जागतिकीकरणाचा भारतीय विवाह संस्थेवर पडलेला प्रभाव | मोकासरे जी. टी. | 74 |
| 21 | जागतिकीकरणानंतरच्या साहित्यातील सामाजिक वास्तव अॅड. एकनाथ आव्हाड यांचे 'जग बदल घालूनि घाव' | डॉ. हनुमंत मिसाळ | 77 |
| 22 | ग्रामीण कृषी आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा चिकित्सक अभ्यास | प्रा.डॉ.साहेबराव हिवाळे | 81 |
| 23 | "जागतिकीकरणाचा दुर्बल घटकांवर होणारा परिणाम" | प्रा. डॉ. पुरुषोत्तम भ. मनगटे | 86 |
| 24 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजजीवनावरील परिणाम : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.टी.आर. फिसफिसे | 89 |
| 25 | भारतीय समाजावरील जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. भोसले एस. ई. | 93 |
| 26 | "जागतिकीकरण आणि कुटुंब" | प्रा. आर.बी. काळे | 96 |
| 27 | जागतिकीकरणातुन नगरीय विकास | प्रा. पोपळघट राजू शेषराव | 99 |
| 28 | कृषीक्षेत्रावरील जागतिकीकरणाचा परिणाम | प्रा.डॉ.मीना बोर्डे- सूर्यवंशी | 102 |
| 29 | जागतिकीकरण आणि भारतीय उच्चशिक्षण | प्रा.बी.व्ही.तौर | 104 |
| 30 | जागतिकीकरणानंतर शिक्षणातुन महिला सक्षमीकरणाची स्थिती | भागवत. द. गोरे | 110 |
| 31 | विधवा स्त्रीविषयक दृष्टिकोन : एक अभ्यास | योगेश बाबासाहेब कवडे | 113 |
| 32 | "जागतिकीकरणाचा पर्यावरणावर झालेला परिणाम : समाजशास्त्रीय अभ्यास". | भावसार तन्मय प्रभाकर | 117 |
| 33 | "जागतिकीकरण व भारतीय स्त्रियांमधील अंधश्रध्दा : विशेष संदर्भ बीड जिल्हा" | मुंडे रामकिशन हरिदास | 120 |
| 34 | जागतिकीकरण आणि भारतीय समाज | प्रा.घाटुळ महादेव सोपानराव | 125 |




Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

# जागतिकीकरणाचा भारतीय विवाह संस्थेवर पडलेला प्रभाव

**मोकासरे जी. टी.**
*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव*

--------------(20)--------------

**प्रस्तावना:-**

१९८०च्या दशकानंतर जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, युनो इ. संस्थाच्या दबावामुळे भारतात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रकीयांना वेग आला. यापाठीमागे दुसरे महत्वाचे कारण होते ते म्हणजे, भारतातील मिश्रअर्थव्यवस्थेचा वाईट अनुभव. भारतातील भ्रष्ट्राचार, नोकरशाही, लालफीतशाही, राजकारण इ. कारणांमुळे सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग बंद पडले, काही दिवाळखोरीत निघाले. यासर्व परीस्थितीमुळे १९९० च्या दशकात भारताजवळ केवळ १०दिवस पुरेल एवढीच गंगाजळी शिल्लक होती. म्हणून भारताने या आर्थिक आरिष्टातून बाहेर पडण्यासाठी १९९० ला नवीन आर्थिक धोरण स्वीकारले. या धोरणामुळे भारतात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यात आला.

१९९४ मध्ये उरुग्वे येथील बैठकीत देशविदेशातील व्यापार विषयक चर्चा झाल्यानंतर, १९९५ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. या देशांमध्ये भारत सुध्दा सामील असल्याने भारतसुध्दा औपचारिकरीत्या जागतिकीकरणाच्या प्रकीयेत सहभागी झाला.

**जागतिकीकरणाचा अर्थ :-**

जागतिकीकरण ही एक प्रक्रीया असून, तीच्याव्दारे जागतिकपातळीवर एकच बाजरपेठ निर्माण करुन राष्ट्राराष्ट्रातील व्यापार मुक्तपणे करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रकीयेत आयात व निर्यातीचे निर्बंध मोठयाप्रमाणात कमी करुन, व्यापार व उद्योगधंदयात उदार धोरण स्वीकारून, खाजगीकरणाला प्रोत्साहन दिले जाते. “गिडन्स या समाजशास्त्रीय विचारवंताच्यामते विभिन्न लोक आणि विश्वातील विविध क्षेत्रातील वाढते परस्परावलंबन व परस्परसंबध म्हणजे जागतिकीकरण होय. हे परस्परावलंबन सामाजिक व आर्थिक संबधामध्ये निर्माण होत असून, त्यात वेळ व स्थानाला गौण स्थान असते.” तर वालस्टीन या विचारवंताच्यामते “जागतिकीकरण ही एक प्रक्रीया आहे, जिचा प्रमुख उद्येश हा भांडवलशाहीचा विस्तार व वृध्दी करणे हा आहे.” मेनकॉम यांच्यामते “वैश्वीकरण ही एक सामाजिक प्रक्रीया असून,तिच्यामध्ये सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेवर असलेला भौगोलिक दबाव कमी होवून सामाजिक व आर्थिक क्रिया मुक्तपणे होतात.”

**जागतिकीकरणाचा भारतातील विवाह संस्थेवर पडलेला प्रभाव:-**

भारतामध्ये हिंदू धर्मानुसार विवाह हा एक पवित्र संस्कार मानला जातो, तर मुस्लीम धर्मानुसार एक करार. विवाहचा प्रमुख उद्येश म्हणजे संतती प्राप्ती, लैंगिक गरजांची पुर्तता व समाज सातत्य टिकवणे हे होय. ‘विवाह म्हणजे समाज संमत मार्गाने लैंगिक गरजांची पुर्तता करणे म्हणजे विवाह होय.’ तसेच ‘दोन किंवा दोन पेक्षा अधिक विषमलिंगी व्यक्तींमध्ये समाजमान्य, लैंगिक संबधाची व्यवस्था व नियमनांचा पुंज, जो कौटुंबिक जिवनासाठी आवश्यक परस्पर उत्तरदायीत्व व अधिकारांनाव्दारे एका सुत्रात बांधते.’ हिंदू विवाह पध्दतीमध्ये प्रत्येक विधीला एक धार्मिक महत्व होते. प्रत्येक विधीची एक निश्चित वेळ, एक निश्चित पध्दत होती व त्याचे पालन काटेकोरपणे केले जात होते. परतु भारतातील जागतिकीकरणाचा प्रभाव व पाश्चमात्यीकरणामुळे भारतीय समाजव्यवस्थे मध्ये खुप मोठया परीवर्तन घडून आले आहे.तसेच सामाजिक संस्थेमधील दर्जा, भूमिका, नियमणे व मुल्यव्यवस्थेतही बदल घडून आला आहे. याला भारतीय विवाह संस्था सुध्दा अपवाद नाही.

भारतात विवाहाची सुरवात जोडीदार निवाडीच्या कार्यक्रमापासून(मुलगी पाहण्याचा कार्यक्रम)होते. पुर्वी जोडीदार निवडण्याचा अधिकार मुलांमुलींना नव्हता. आई वडीलच मुलगी पसंत करायचे व लग्न लावून देत असे. मुलांमुलींची केवळ औपचारिकता असे. मात्र आज चित्र बदलले आहे. आज केवळ मुलेच मुलींना बघत नाही तर मुलीसुध्दा मुलांना बघण्यास जातांना दिसून येत आहे. मुलींनाही मुलांना प्रश्न विचारण्याचे धाडस निर्माण झाले असून, काही अटी व शर्तीही मुली मुंलापुढे ठेवत आहे. हा एक महत्वपुर्ण बदल जागताकीकरणामुळे भारतीय विवाह संस्थेमध्ये झालेला दिसून येतो. अनेक तरुण-तरुणी शिक्षणाच्या निमीत्ताने बाहेरगावी राहत आहे.



Scanned with CamScanner

ISSN : 2319 – 8648 CURRENT GLOBAL REVIEWER
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

त्यामुळे तेथे ऐकमेकांची ओळख होऊन, आचार विचार जाणून घेतले जातात. त्याचा परीणाम म्हणून अरेंज मॅरेज ऐवजी प्रेम विवाहाचे प्रमाण वाढले आहे. प्राचीन भारतात परीक्षा विवाहा मध्ये वरांची परीक्षा घेतली जात असे व त्या परीक्षेत पास झालेल्या वरा सोबत वधूचा विवाह लावून दिला जात असे उदा. सीता स्वयंवर. आज सुध्दा जागतिकीकरण व पाश्चमात्यीकरणाच्या प्रभावाने टी. व्ही. चॅनल वर अनेक सीने कलाकार स्वयंवराचे आयोजन करतात. तेथे अनेक देशी, विदेशी तरुण सहभाग घेतात व जो योग्य वर वाटेल, जो नियम व अटीचा पुर्तता करेल, त्याच्याशी संबधीत तरुणी विवाह करते. हा एक नवीन बदल भारतीय विवाह संस्था अनुभवत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रभावाने संगणक व इंटरनेटचे जाळे देशभर पसरले व विवाह संस्थेवरही त्याचा प्रभाव पडला. पुर्वी विवाह संबध जुळवण्याचे काम नातेवाईक व मित्रमंडळ करत असे. शेतावरील बांधवर तंबाखु खात खात किंवा बीडी पित पित दोन शेतकरी चर्चा करून विवाह जोडत होते. आज मात्र गतीमान जीवनसरनीने माणुस यंत्रवत बनला आहे त्याला इतरांसाठी वेळ नाही त्यामुळे नातेसंबधात घनिष्टता राहीली नाही. प्रेम,आपुलकी कमी होत चालली आहे. त्यामुळे विवाह जोडण्यासाठीही नातेवाईक तेवढे रस घेतांना आता दिसत नाही.म्हणून आई वडीलांना आता इंटरनेट व विवाह नोंदनी संस्थाचा आधार घ्यावा लागत आहे. प्रत्येक जातीचे वधू वर परीचय मेळावे होत आहे. याशीवाय समाजात विवाह जुळवून आणणारे काही एजेंट (दलाल) निर्मान झाले असून, त्याच्यामार्फत विवाह जुळवून आणले जात अहे. पुर्वी विवाह म्हणले म्हणजे एक महीना घरी पाहूण्याची रेलचेल असायची. तीन दिवसाची हळद, विवाह व विवानंतरचे दोन तीन दिवस वेगवेगळे विधी असे कार्यक्रम असायचे. आज मात्र लोकांकडे वेळच नाही एकाच दिवसात कुंकू, हळद व विवाह सुध्दा केले जात आहे. यालाच गेटकीन विवाह असे म्हणल जात आहे.

भारतात जागतिकीकरणा पुर्वी बालविवाहाचे प्रमाण मोठया प्रमाणात होते. आज बालविवाहाच्या प्रमाणात बऱ्याच अंशी कमी झालेली दिसून येते. सद्यस्थितीत मुली १८ ते २५ वयापर्यंत विवाह करतांना दिसतात तर मुले ही २१ ते ३० वयापर्यंत विवाह करतांना आढळून येत आहे. पुर्वी पतीचे वय पत्नीपेक्षा अधिक असावे ही अलिखीत अटच होती. आज मात्र अनेक विवाहांमध्ये मुर्लीचे विवाहाचे वय हे मुलांबरोबर किंवा त्यापेक्षाही जास्त असलेले दिसून येते. या शिवाय अनेक चित्रपटांमधूनही असे चित्रन होतांना दिसत आहे उदा. बुढा होगा तेरा बाप मध्ये वृध्द अभिताभ तरुण मुलीशी प्रेम करतांना दिसतो. नुकतिच एक टि. व्ही सिरीयल सुरु झालीय तीच्यामध्ये ४२ वर्षाच्या स्त्रीवर २४ वर्षाचा तरुण प्रेम करतांना दिसतोय. थोडक्यात आज विवाहासाठी वयाची अट ही प्रमुख निकष राहिलेली नाही.

जागतिकीकरणापुर्वी भारतात प्रत्येक व्यक्तीसाठी विवाह ही एक अनिवार्य अट होती. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला लग्न करावेच लागायचे. आज मात्र अनेक तरुण व तरुणी अविवाहीत राहणे पसंद करत आहे. लग्न न करता अनेक जोडपे 'लिव्ह इन रीलेशनशिप' मध्ये राहतांना दिसत आहे. एकत्र राहायचे, लैगिक संबध ठेवायचे, मात्र मुलबाळ होऊ दयायचे नाही. दोघांत मतभेद निर्माण झाल्यास वेगळे होऊन परत दुसऱ्या सोबत रिलेशरशिप निर्माण करायची. याशिवाय विवाह, आपत्य यामुळे आपले तारुण्य व सौदर्य खराब होईल या भितीमुळे अनेक सिनेकलाकार लग्न न करणे पसंद करतात तर काही खुप उशीरा लग्न करतात. आज विवाह हा पवित्र संस्कार न राहता केवळ एक करार बनत चालला आहे कारण आज विवाहांमध्ये धार्मिक विधींना फारसे महत्व राहिले नाही. तर त्या केवळ औपचारिकता म्हणून पाळल्या जात आहे. उदा. सप्तपदी, कन्यादान, हळदीचा कार्यक्रम, देवदर्शन इ. याऐवजी चंगळवाद भव्यमंडप किंवा हॉल, फोटोशेषन, चित्रिकरण, मेकअप, मिष्ठांनाची रेलचेल, मंत्र्यासंत्र्याची लग्नाला उपस्थिती या प्रतिष्ठेच्या बाबी ठरत आहे. मंगलाष्टके सुध्दा आता ब्राम्हणा ऐवजी ऑर्केस्ट्रातील गायक म्हणत आहे.त्यामुळे विवाह संस्थेतील सामाजिक आंतरक्रीया, संबध, भुमीका व दर्जा यामध्ये खुप बदल होतांना दिसत आहे. विवाहासाठी मोठयाप्रमाणात हुंडा घेणे हे ही एक प्रतिष्ठेचे साधन बनत आहे, तर दुसरीकडे अनेक जातीतील मुलांना मुली मिळत नसल्याने ते कोणत्याही जातीची किंवा पैसे देवून विवाह करतांना दिसत आहे. स्त्री भ्रुण हत्येमुळे हा प्रश्न निर्माण झाला असून, मारवाडी व ब्राम्हण समाजात मुर्लीची टंचाई जास्त भासत आहे.

पुर्वी जातीअंतर्गत विवाह करणे बंधनकारक होते. आज मात्र विवाह संस्था जात, धर्म व वंशाचे बंधन मोडीत काढतांना दिसत आहे.

आज अनेक आंतरजातीय, आंतरधर्मिय व आंतरवंशीय विवाह होतांना दिसत आहे. एवढेच नव्हे तर परदेशतील तरुणांसोबत किंव तरुणी सोबत सुध्दा येथिल तरुण तरुणी विवाह करतांना दिसत आहे. याशिवाय आज अनेक समलिंगी विवाह, गे मॅरेजेस होतांना दिसत आहे. नुकतेच विदर्भातील एका तरुणाने चीनच्या तरुणासोबत विवाह (समलिंगी)केला. विशेष म्हणजे हा तरुण परदेशात नोकरीला आहे व त्याच्या विवाहाला अनेक भारतीय व चीनचे नातेवाईक व मित्रमंडळी उपस्थित होते. पुर्वी विवाहानंतर देवदर्शनला खुप महत्व होते

विशेषतः कुलदैवताचे दर्शन हे अनिवार्य असायचे व त्यानंतर लैगिक संबध प्रस्थापीत होत. आज मात्र विवाहा आगोदरच अनेक जोडपे लैगिक संबध ठेवतात किंवा देवदर्शनाच्या नियोजना ऐवजी हनिमुनच्या नियोजनाला जास्त महत्त्व दिले जात आहे. एखादे पर्यटन स्थळ किंवा परदेशवारी ही
हनिमुनसाठी केली जाते. आज मुस्लीम धर्मातील महिला तलाकच्या धार्मिक कायद्याला विरोध करुन नवीन कायदयाची मागणी करत आहेत. हे सुध्दा विवाह संस्थेतील बदलाचे एक सुचक आहे. जे जागतिकीकरण, शिक्षण व पाश्चात्यकरणाचे फलीत आहे.

**सारांशः-**

जागतिकीकरण ही एक सामाजिक व आर्थिक प्रक्रीया असून तीच्यामुळे जागतीक पातळीवरील सामाजिक व आर्थिक क्रियावाढून सामाजिक संबध अधिक दृढ झाले आहे. याचा प्रभाव सहाजिकच भारतीय विवाह संस्थेवरही पडला आहे व तिच्यातील दर्जा, भूमिका, नियमने व मुल्य यात मोठया प्रमाणत बदल झाले आहेत. जागतिकीकरणा पुर्वी विवाह एक धार्मिक पवित्र संस्कार होता तो आता एक प्रतिष्ठेचा संस्कार व करार बनत चालला आहे. गेटकीन विवाहाचे प्रमाण वाढून, विवाह नोंदनी संस्थामार्फत विवाहसंबध जुळवले जात आहे.विवाह करणे अनिवार्य राहिले नसून लिव्ह इन रिलेशनशिप वर वैवाहिक संबंध निर्माण होत आहे.विवाहासाठी वय हा निकष गौण होत चालला आहे. मुलीच्या वैवाहिक अधिकारत वाढ होतांना दिसत आहे. प्रेम विवाह, समलिंगी विवाह, गे मॅरेजेस वाढत आहे. जात , धर्म व वंशाचे बंधने कमी होउन अनेक तरुण, तरुणी एनआरआय शी विवाह करत आहेत. धार्मिक विधी मात्र केवळ औपचारिकता म्हणून राहिले असून, चंगळवाद वाढला आहे.

**संदर्भ सुचीः-**

१. भारतीय अर्थव्यवस्था, प्रा. रायखेलकर, दामजी, विद्याबुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.२००३
२. विकासाचे समाजशास्त्र , शिवबाल सिंग, रावत पब्लीकेशन, जयपूर. २०१०
३. सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन,दिल्ली . २०१०
४.भारतीय सामाजि व्यवस्था, दोषी, जैन, नेशनल पब्लीकेशन हाऊस, जयपूर.२०१०
५. आधुनिकता, उत्तर आधुनिकता एंव नवसमाजशास्त्रीय सिध्दांत, एस.एल.दोषी, रावत पब्लिकेशन,दिल्ली . २००८



Scanned with CamScanner